श्रीराम बोअरवेल

सावंतवाडी
९४२०२९३७९९,
७५८८५७०५८७,
७७७४८५१००४,
७७६८८९८६५९

४ इंच व ६ इंच बोअरवेल योग्य दरात खोदाई करुन मिळेल. बोअरवेलसाठी पाणी पॉईंट सर्व्हे करुन मिळेल व पाणी न लागल्यास १०० टक्के रक्कम परत दिली जाईल.
(नियम व अटी लागू)

शब्दांना सत्याची धार

प्रहार

■ नोंदणी क्रमांक : एमएएचएमएआर/२००८/३३७८७ ■ सिंधुदुर्ग ■ वर्ष १४ ■ अंक ९७ ■ पाने ८ ■ तीन रुपये

www.prahaar.in | शुक्रवार, १६ फेब्रुवारी २०१८ | www.eprahaar.in

एस. पी. बोअरवेल्स
कणकवली

४.५",६",६.५"आणि ९" बोअरचे पॉईंट योग्य दरात मारून मिळतील. तसेच बोअरवेल्सचे पंप फिटींग करून मिळतील.

प्रोप्रा.
उदय पाटील
संपर्क : ९४२२६३२६०२ / ९४२१२३७२४७ / ७७४१८७६३७३ / ९४२०३६६५९६ / ९४०४९२२१३२

पत्ता : सना कॉम्प्लेक्स, पोस्ट ऑफिससमोर, आचरारोड, कणकवली

एस. एस. बोअरवेल

६ व ६.५ इंच. बोअरवेल खोदाई, नवीन पंप फिटिंग व दुरुस्त करुन मिळतील. बोअरमध्ये अडकलेले पंप काढून मिळतील.

समीर पाटील
संपर्कः एस. एस. इलेक्ट्रीक वर्क्स, आचरा रोड, डॉ. राणे हॉस्पिटलशेजारी, कणकवली
९४२१२३७१३०, ९४२०२६१२७१, ९४२२९९५९९४, ९०११६३०९०१

परप्रांतीय बोटींची घुसखोरी थांबवा अन्यथा आंदोलन-नारायण राणे

- मुख्यमंत्री, मत्स्यव्यवसाय मंत्र्यांशी भेट घेऊन चर्चा करण्याचे आश्वासन
- परप्रांतीय बोटींना पकडण्यासाठी हायस्पीड गस्तीनौका द्या
- मासळीच्या लुटमारीमुळे स्थानिक मच्छिमारांवर उपासमारीची वेळ
- न्यायासाठी आंदोलन करणाऱ्यांवर खंडणी, दरोड्याचे गुन्हे निषेधार्ह
- शिवसेनेचे आमदार, खासदार, पालकमंत्री यांच्यात दमच नाही
- प्रशासकीय यंत्रणांच्या डोळ्यादेखत घुसखोरी करुन मासळीची लुट

महाराष्ट्र स्वाभिमान संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नारायण राणे यांनी निलरत्न बंगल्यावर मच्छीमारांची भेट घेतली असताना अटकेत असलेल्या गोपीनाथ तांडेल यांची आई, जोसेफ नऱ्होना यांची आई व पत्नी माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांच्याकडे कैफियत मांडताना. सोबत अन्य मच्छिमार बांधव व मच्छिमार महिला. (छाया : संदीप बोडवे)

▶ मालवण (प्रतिनिधी)

भाजप-शिवसेना युती सरकार बरोबरच येथील लोकांनी निवडुन दिलेले शिवसेनेचे आमदार, खासदार आणि पालकमंत्री यांचा सिंधुदुर्गच्या किनारपट्टीवर लक्ष राहिलेला नाही. मुळात त्यांच्यामध्ये कोणताही दम नसल्यामुळे मच्छीमारांवर अन्यायाची ही परिस्थिती आली आहे. प्रशासकीय यंत्रणा आणि राज्यकर्त्यांच्या डोळ्यादेखत परप्रांतिय हायस्पीड नौका बेकायदेशीरपणे येऊन घुसखोरी करत आहेत व इथल्या मासळीची लूट करत आहेत. त्यामुळेच येथील मच्छीमार देशोधडीला लागला आहे. त्यांच्यावर उपासमारीची पाळी आली आहे. शासनाच्या नाकर्तेपणामुळे स्थानिक मच्छीमारांनी परप्रांतिय नौकांविरोधात आंदोलन छेडले तर शासकीय यंत्रणा त्यांच्याविरोधात दरोडा आणि खंडणी सारखे अजामिनपात्र गुन्हे दाखल करत आहे हे कृत्य निषेधार्ह आहे. गोव्याचे मुख्यमंत्री आपल्या राज्यातील ट्रॉलरवाल्यांसाठी सिंधुदुर्गातील प्रशासनाला कामाला लावतात तर आमचे सरकार काय करत आहे? असा सवाल महाराष्ट्र स्वाभिमान पक्षाचे अध्यक्ष माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांनी केला. या संदर्भात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तसेच मत्स्य व्यवसाय मंत्र्यांची भेट घेऊन आपण चर्चा करणार आहोत आणि परप्रांतीयांची घुसखोरी थांबविण्यासाठी सक्षम यंत्रणा देण्याची मागणी करणार आहोत. त्यानंतरही मात्र या परिस्थितीत कोणताही बदल झाला नाही तर २३ फेब्रुवारी रोजी सिंधुदुर्गात बंद आंदोलन छेडण्यात येईल. तसेच बेकायदेशीर मच्छिमारीला आळा घालण्यासाठी त्यांच्या नौका समुद्रात जाऊन आम्ही पकडून सरकारला बक्षीस देऊ. या आंदोलनाचे नेतृत्व मी स्वतः करेन असा इशाराही माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांनी दिला.

गेल्या काही दिवसांपासून मालवण किनारपट्टीवर एलईडी पर्ससीनद्वारे हायस्पीड बोटींमार्फत कोकणच्या किनाऱ्यावर १० बावमध्ये घुसखोरी करत बेकायदेशीरपणे मासेमारी करणाऱ्या नौकांच्या विरोधात स्थानिक मच्छीमारांनी आंदोलन छेडले असुन या आंदोलनात गोपीनाथ तांडेल व जोसेफ नऱ्होना यांच्या सारख्या आंदोलनकर्त्या मच्छीमारांवर दरोडा आणि खंडणी सारखे अजामिनपात्र गुन्हे नोंदविण्याचे काम पोलीस आणि प्रशासनाने केले आहे. या पार्श्वभूमीवर मच्छीमारांची भेट घेण्यासाठी माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांनी गुरुवारी मालवणचा दौरा केला. यावेळी विविध संघटनांच्या मच्छीमार प्रतिनिधींनी आणि पारंपारिक मच्छीमारांनी नारायण राणे यांच्या मालवण येथील 'निलरत्न' बंगल्यावर आपली कैफियत मांडली व सरकारी यंत्रणेकडुन स्थानिक मच्छिमारांच्यावर चालु असलेला अन्याय कथन केला. त्यावेळी नारायण राणे यांनी आपण स्वतः मच्छिमारांच्या पाठीशी असुन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊ. असे आश्वासन दिले. त्यानंतर माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांनी मालवण पोलीस स्थानकात भेट देऊन तेथे उपस्थित असलेल्या जिल्हा अप्पर पोलीस अधिक्षक प्रकाश गायकवाड व मालवण येथील पोलीस अधिकाऱ्यांशी चर्चा केली. स्थानिक मच्छिमारांवरील अन्याय खपवुन घेणार नाही असेही त्यांना सांगितले. स्थानिक मच्छीमारांना सहकार्य करण्याचे आणि गुन्ह्यात नाहक गोवण्यात येऊ नये, अशा सूचना केल्या. यावेळी गायकवाड यांनी आपण सरकारकडे समुद्रातील गस्तीसाठी गस्ती नौका मागू असे सांगितले. त्याचप्रमाणे जे काही खरं घडलं आहे, **(पान २ वर)**

गोपी तांडेल-जोसेफ नऱ्होनाच्या नातेवाईकांची कैफियत

नारायण राणे हे मालवणमध्ये मच्छीमारांना भेटायला आले असता गोपीनाथ तांडेल यांची आई तसेच जोसेफ नऱ्होना यांची आई व पत्नी यांनी नारायण राणे यांची भेट घेतली व आपल्या मुलांना याप्रकरणात नाहक गोवण्यात आले असल्याचे सांगितले. यावेळी तांडेल यांच्या आईने आपल्या मुलाची सुटका व्हावी, अशी विनंती राणे यांच्याजवळ केली. तर जोसेफ यांच्या पत्नी व आईनेही राणे यांच्याजवळ आपली कैफियत मांडली. आमची उदरनिर्वाहाचे एकमेव साधन असलेली मासेमारीची बोट पोलीस प्रशासनाने ताब्यात घेतली असल्याचे जोसेफ यांच्या पत्नी म्हणाल्या. जोसेफसह बोटीची लवकरात लवकर सुटका व्हावी, असेही त्या म्हणाल्या.

डोकेदुखीने हैराण प्रजा पेनबाम करी काम राजा

उन्हाळा, सर्दी, थंड पाणी ह्या सर्व कारणांमुळे आज आपण डोके दुखीने होता बेजार अहिल्या आयुर्वेदिकने संशोधन करून एक साधा सोपा उपाय केला आहे सादर

'खो-गो'® (आयुर्वेदिक) पेनबाम

एकदा वापरून पहा, तुम्हीही म्हणाल 'खो-गो' पेनबाम करी काम राजा.

'खो-गो'® (आयुर्वेदिक)
अहिल्या आयुर्वेदिक औषधायलय, मुंबई ६३.
मोबाईल ९१-८१०८६८०००९ ● सर्वत्र उपलब्ध

बौद्धायती श्री

नीरव मोदीच्या मालमत्तेवर छापे; मुंबईतील घर सील

◀◀ पान २ वर

हॉकी विश्वचषकासाठी 'पाकिस्तान' भारतात येणार

◀◀ पान २ वर

माजी खा. निलेश राणे आज मालवण पोलिसांची घेणार भेट

▶ मालवण (प्रतिनिधी):

गोवा येथील ट्रॉलर्स कडून खंडणीची मागणी केल्याप्रकरणी पोलिसांनी मच्छीमारांचे अटकसत्र सुरू केले आहे. त्यामुळे मच्छीमारांमध्ये घबराट पसरली असून या मच्छीमारांना आधार देण्यासाठी माजी खासदार निलेश राणे गुरुवारी मालवणात दाखल झाले.या प्रकरणी अटकेत असलेल्या मच्छीमारांची भेट घेण्यासाठी माजी खासदार निलेश राणे शुक्रवारी सकाळी १० वाजता मालवण पोलीस ठाण्यात जाणार आहेत. त्यानंतर श्री. राणे निलरत्न निवासस्थानी पत्रकारांशी संवाद साधणार आहेत.

सिंधुदुर्गच्या समुद्रात बेकायदेशीर एलईडी मासेमारी करणाऱ्या गोवा येथील ट्रॉलर्सना स्थानिक मच्छीमारांनी पकडून मालवणात आणल्यानंतर गोवा ट्रॉलर्सच्या मालकांनी येथे दाखल होत येथील मच्छीमारांवर खंडणी मागितल्याची तक्रार दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी मच्छीमार नेते गोपीनाथ तांडेल, जोसेफ नऱ्होना यांना अटक केली आहे. या प्रकरणात पोलिसांनी मच्छीमारांचे अटकसत्र सुरू केले आहे. त्यामुळे मच्छीमारांमध्ये घबराट पसरली असून या मच्छीमारांना धीर देण्यासाठी माजी खासदार निलेश राणे गुरुवारी मालवणात दाखल झाले. त्यांनी निलरत्न निवासस्थानी महाराष्ट्र स्वाभिमान पक्षाच्या पदाधिकारी, मच्छिमारांशी चर्चा केली. त्यानुसार शुक्रवारी पोलीस ठाण्यात भेट देऊन अटकेत असलेल्या मच्छीमारांची ते भेट घेणार आहेत. त्यानंतर निलरत्न निवासस्थानी पत्रकारांशी संवाद साधणार असून मच्छीमारांनी यावेळी उपस्थित **(पान २ वर)**

पोलिस कारवाईच्या निषेधार्थ मालवणात मासेमारी बेमुदत बंद

पोलीस आणि प्रशासनाच्या विरोधात येथील मच्छीमारांनी मासेमारी बंद आंदोलन पुकारल्याने आज दिवसभर गजबजलेल्या मच्छीमार्केटजवळ शुकशुकाट दिसून येत होता.

▶ मालवण (प्रतिनिधी)

परराज्यातील ट्रॉलर्सवाले येथील मच्छीमारांच्या डोळ्यादेखत त्यांच्या हक्काच्या मासळीची लूट करत असल्याने मच्छीमारांना याच्या विरोधात जनआंदोलनात सहभागी असलेल्या मच्छीमारांवर पोलीस प्रशासन आणि सरकारने दरोडा आणि खंडणीसारखे गुन्हे दाखल केले. या सगळ्याचा निषेध म्हणून मालवणातील सर्व प्रकारच्या मच्छीमारांनी बेमुदत मच्छीमारी बंद आंदोलन पुकारले आहे. गुरुवारी दिवसभर मालवण बंदरातून मासेमारीसाठी नौका बाहेर पडल्या नाहीत. मासेमारीसाठी गेलेल्या नौका मालवण बंदरात परतल्या आहेत. पोलीसांच्या दंडूकेशाही विरोधात पुकारण्यात आलेल्या बंद मध्ये गिलनेटधारक, न्हयवाले, पारंपारिक मच्छीमार, रापण संघ, ट्रॉलर्सवाले, अन्य यांत्रिकी मच्छीमार, मत्स्यविक्रेत्या, **(पान २ वर)**

सात खलाशांना अटक

गोवा ट्रॉलर्सवरील धरपकड प्रकरणी जोसेफ नऱ्होंना याच्या ट्रॉलरवरील सात खलाशांना पोलिसांनी गुरुवारी अटक केली अशी माहिती अप्पर पोलिस अधीक्षक प्रकाश गायकवाड यानी दिली. या प्रकरणी आणखी एका मच्छीमाराला पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. करकाप्पा बसप्पा मडिवार (वय-५० रा. बळगिरी-कलबुर्गा- कर्नाटक), मनी गणपती मेस्त्री (वय- ४० रा. कुलखीर होणावळ कारवार), उमेश मुरलीधर आडविलकर (वय-३७ रा. गावडे आंबेरी रत्नागिरी), विकास कृष्णा मयेकर (वय-४९ रा. काळबादेवी मंदिर रत्नागिरी), संत्या चनाप्पा वसवावे (वय-२२ रा. ईहगील ता. एकबुर्गा कर्नाटक), परसप्पा मरप्पा गुरकार (वय-४० रा. नेरेगरह), हनुमंताप्पा मुरकप्पा बुगार (वय-५० रा. मंडणगिरी कर्नाटक) या सात खलाशांना अटक करण्यात आली.

बडोद्यात आजपासून सारस्वतांचा मेळा

पूर्वसंध्येला ग्रंथदिंडीद्वारे साहित्य संस्कृतीचे अनोखे दर्शन

▶ बडोदा

९१ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन बडोद्यात शुक्रवारपासून बडोदा येथे सुरु होत आहे. त्याच्या पूर्वसंध्येला गुरुवारी सायंकाळी ग्रंथदिंडी काढून प्रारंभ करण्यात आला. माजी सनदी अधिकारी असलेल्या साहित्यिक लक्ष्मीकांत देशमुख यांचे अध्यक्षतेखाली होत असलेले बडोद्यातील हे चौथे साहित्य संमेलन आहे. यापूर्वी १९०१ मध्ये सातवे संमेलन, १९२१ मध्ये अकरावे संमेलन आणि १९३४ मध्ये विसावे संमेलन बडोद्यात झाले होते.

१६,१७ आणि १८ फेब्रुवारी असे तीन दिवस हे साहित्य संमेलन चालणार आहे. या संमेलनाचे अध्यक्ष माजी सनदी अधिकारी लक्ष्मीकांत देशमुख आहेत. या संमेलनाच्या तयारी वरून सध्या अंतिम हात फिरवला जात आहे. या संमेलनात कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. बोलीतील कविता असं मराठीच्या वऱ्हाडी, अहिराणी, कोकणी अशा विविध बोलीतील काव्य संमेलन होणार आहे. तर नागर ते नांगर या विषयावर एक टॉक शो घेतला जाईल. तसंच कथालेखकांचे आयुष्य त्यांच्या कथेच्या विश्वाचा वेध घेणाराही एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. मराठी भाषा सुंदरी हा मराठीचे बहुरूपी दर्शन घडवणारा कार्यक्रमही **(पान २ वर)**

स्नान पर्वाने झाली कुणकेश्वर यात्रेची सांगता

शिवभक्तांचा कुणकेश्वराच्या प्रांगणात गजर

स्नान पर्वात सहभागी झालेले शिवभक्त आणि देवस्वाऱ्या. (छाया-वैभव केळकर)

▶ देवगड (प्रतिनिधी)

दक्षिण कोकणची काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्रीदेव कुणकेश्वर यात्रेची सांगता देवस्वाऱ्यांच्या भाविकांच्या तीर्थस्नानाने झाली गुरुवारी रात्रीपर्यंत अमावस्या असल्याने समुद्र धार्मिक विधी तीर्थस्थान करण्यासाठी लाखो भाविकांनी उपस्थिती लावली यात्रेमध्ये कोट्यवधी रुपयांची उलाढाल झाली आहे अमावस्या असल्याने यात्रेच्या दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी भाविकांच्या गर्दीचा ओघ वाढला होता.गुरुवारी पहाटेपासून देवस्वाऱ्या बरोबर तीर्थस्थान करण्यासाठी लाभ लाखो भाविकांनी उपस्थिती दर्शविली होती **(पान २ वर)**

सरकारी महिला नोकरदार,शिक्षिका वर्गासाठी खूषखबर!

'या 'कारणामुळे आपल्या घराजवळ बदली मिळणार

▶ मुंबई

शासकीय सेवेतील महिला अधिकाऱ्यांना आपल्या पतीच्या आई-वडिलांच्या गंभीर आजाराच्या कारणास्तवही महसुली विभाग बदलून मिळण्यासाठी विनंती अर्ज करण्यास परवानगी देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. त्यासाठी महसूली विभाग वाटप नियम -२०१५ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय नुकताच घेण्यात आला. या निर्णयामुळे अनेक गरजू महिला अधिकाऱ्यांची सोय होणार आहे.दरम्यान,दुर्गम व अतिदुर्गम भागातील **(पान २ वर)**

आता कोलगेट 100 ग्रॅ. पॅक

~~₹52~~ ₹46/-*

*एमआरपी सर्व करांसहित. जीएसटी मुळे किंमतीत कपात.

Colgate